अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल **aadmcgeneral@punecorporation.org**
अपिल क्र. ०२/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ १०७२६ दि. १८।२।२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

**अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/०२/२०१९**

**श्री गणेश सुरेश बोऱ्हाडे**
मु. झोळे पो. चंदनापुरी
ता. संगमनेर जि. अहमदनगर

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

श्री गणेश सुरेश बोऱ्हाडे मु. झोळे पो. चंदनापुरी ता. संगमनेर जि. अहमदनगर (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. २४.१२.२०१८ रोजी अर्ज करून "मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचे मान्यतेचा ठराव क्र. १/७८० दि. १०.१२.२०१८ नोंदविला असलेली नस्ती (फाईल) त्यामधील सर्व कागदपत्रे, शेरे, टिपणीसह मिळावी" या बाबत माहिती मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/९२४३ दि. १४.०१.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २४.१२.२०१८ | २४.१२.२०१८ | २२.०१.२०१९ | १४.०१.२०१९ | - |

अपिलार्थी यांचे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी अपील क्र. ०२/२०१९ चा अपील अर्ज दि. २४.०१.२०१९ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २४.०१.२०१९ | २४.०१.२०१९ | १२.०२.२०१९ | होय | - |

सदर प्रकरणी दि. १३.०२.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्री गणेश सुरेश बोऱ्हाडे** मु. झोळे पो. चंदनापुरी ता. संगमनेर जि. अहमदनगर हे उपस्थित होते. **श्री नामदेव भोईर,** जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी यांचे प्रतिनिधी, आस्थापना विभाग, पुणे मनपा हे उपस्थित होते.

**विवेचन**

श्री गणेश सुरेश बोऱ्हाडे मु. झोळे पो. चंदनापुरी ता. संगमनेर जि. अहमदनगर यांनी माहिती मिळाली नसल्याचे प्रतिपादन केले तर **श्री नामदेव भोईर** जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी यांचे प्रतिनिधी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/९२४३ दि. १४.०१.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे असे प्रतिपादन केले.

## आदेश

अपिलार्थी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,** आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी अपिलार्थी यांना त्यांचे अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध माहिती ७ दिवसात विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. सबब अपील क्र. ०२/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका